**G + 1 घर विकणे आहे**

जुळे सोलापूर येथे प्राइम लोकेशनमध्ये सु-निर्मित G + 1 घर विकणे आहे. भूखंड क्षेत्र : ११२० चौ. फूट. बिल्ट-अप क्षेत्र : ९७० चौ. फूट. बांधकाम : Ground floor-1BHK टॉयलेट, बाथरूम. पहिला मजला - १ रूम, टॉयलेट, बाथरूम. (विस्तृत आणि हवेशीर)

**ठिकाण** : १२४, शिवगंगा नगर भाग २, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर, भरपूर नैसर्गिक प्रकाश आणि वायुवीजन, शाळा, डी मार्ट, बाजारपेठ यांच्या जवळ.

**अपेक्षित किंमत : ७८ लाख + टॅक्स**

**संपर्क : माशाळकर दयानंद - ९४२३३३१७५२, सदानंद माशाळकर - ९९२४१४८९७०-७८**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com



**लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय**

**फक्त ५१०००/- रु.**

जेवणासह (अटी लागू)

• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय

**श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट**

अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट

मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक १३७ वा | शनिवार, दि. २८ डिसेंबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR



**हुरडा पार्टी**

**शालेय सहल व हुरडा पार्टी**

आनंददायी शालेय सहल व निसर्गाच्या सानिध्यात हुरडा पार्टी साठी कल्याणम कृषी पर्यटन केंद्र, काटगाव फाटा, तांदुळवाडी, हैदराबाद रोड, सोलापूर.

मो. ९८६०६३४८३४ / ९८६००९३०११


# संतोष देशमुख प्रकरणातील आरोपींच्या अटकेसाठी, बीडमध्ये निघणार मूकमोर्चा



## सरपंचांच्या लेकीसाठी या, जरांगेंची हाक; मोर्चात सहभागी होण्याचे आवाहन

**बीड (कटूसत्य वृत्त):-** बीडच्या मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून नागरिक आक्रमक झाले आहेत. या हत्या प्रकरणानंतर संतप्त झालेल्या नागरिकांनी शनिवारी महामूक मोचार्चे आयोजन केले आहे. आज बीडमध्ये निघणाऱ्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर मोठी वाहतूक कोंडी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे बीडमधील वाहतूक मार्गात अनेक बदल करण्यात आले आहेत. सकाळी आठ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत वाहतूक मार्गात हे बदल राहणार आहेत. त्यामुळे नागरिकानी पर्यायी मार्गाचा वापर करण्याचं आवाहन केले जात आहे.

संतोष देशमुख हत्या प्रकरणी विविध मागण्यांसाठी शनिवारी महामूक मोचार्चे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी होऊन नागरिकांची गैरसोय होऊ नये यासाठी बीड शहरामध्ये येणाऱ्या वाहतूक मार्गात बदल करण्यात आले आहेत. त्यामुळे ही वाहतूक पर्यायी मार्गाने वळविण्याचे आदेश पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी काढले आहेत.

विविध पक्षांच्या नेत्यांच्या बैठका, संघटनांच्या आवाहनामुळे मोर्चा मोठा निघेल, असा अंदाज असून त्यादृष्टीने आता पोलिसांकडूनही बंदोबस्ताची तयारी केली जात आहे. ता. नऊ डिसेंबरला संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृण खुन करण्यात आला.

याप्रकरणात सात जणांवर गुन्हा नोंद असून अद्याप तीन प्रमुख आरोपी फरार आहेत. तर, मारहाण व खंडणीतील देखील दोन आरोपी फरार आहेत. ज्या पवनचक्कीवर खंडणी मागीतल्याची घटना घडली त्याचाच या खुनाच्या घटनेचा संदर्भ असल्याने या घटनेच्या सुत्रधारावरही गुन्हा नोंद करावा, सर्व आरोपींना अटक करावी, जिल्ह्यातील दहशत कमी करावी, आदी विविध मागण्यांसाठी सर्वपक्षीय मोर्चाचे नियोजन करण्यात आले आहे. मोर्चाच्या तयारीसाठी जिल्हाभरात बैठकाही घेतल्या जात आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करुन शनिवारी सकाळी ११ वाजता मोर्चाची सुरुवात होईल. दरम्यान, खुनाच्या घटनेला १६ दिवस उलटले आहेत.

या घटनेतील मुख्य आरोपी अद्याप अटक नाही. तसेच, या घटनेमागील सुत्रधार शोधावा, घटनेवेळी आरोपींनी कोणाला व्हिडीओ कॉल केले, व्हिडीओ पाठविले याचा शोध घ्यावा, तसेच विविध चार घटनांच्या अनुषंगाने संबंधीतांचे कॉल डिटेल्स शोधण्याच्या मागणीमधील जोर आणि या घटनेबाबतचा जिल्ह्यात संताप कायमच आहे.

बीडमध्ये संदीप क्षीरसागर, मराठा सेवक, मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयकांनी नियोजन बैठकीनंतर आता सर्कलनिहाय बैठका घेतल्या जात आहेत. भाजपचे आमदार सुरेश धस यांनीही मोर्चात सहभागाचे आवाहन करत आपणही सहभागी होणार असल्याचे सांगीतले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रकाश सोळंके यांनीही मोर्चात सहभागाचे आवाहन केले आहे. विविध संघटनांसह मुस्लिम संघटनांनीही मोर्चाला पाठींबा देत सहभागाचे आवाहन केले आहे. त्यामुळे वरचेवर मोचार्ला व्यापक रुप येत आहे.

## सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात (पोलीस आयुक्तालय हद्द वगळून) सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून दि. 29 डिसेंबर 2024 सकाळी 08 वा.पासुन ते 12 जानेवारी 2025 रात्री 08 वा.पर्यंत या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम 37 (1) व 37 (3) (अ ते फ) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत, असे अपर जिल्हादंडाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे.

हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

## मोहोळच्या चिंचोली एमआयडीसी तीन बांगलादेशी नागरिकांना अटक

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** कोणत्याही वैद्य कागदपत्रांशिवाय तसेच भारत-बांगलादेश सीमेवरील मुलकी अधिकारी यांच्या लेखी परवानगीशिवाय घुसखोरीच्या अवैद्य मार्गाने भारतात प्रवेश करून मोहोळ तालुक्यातील चिंचोली काटी एमआयडीसीतील दोन कंपन्यांमध्ये नोकरी व वास्तव्य करताना तीन बांगलादेशी नागरिक आढळून आल्याने मोहोळ पोलिसांनी त्यांच्यावर परकीय नागरिक कायदा कलमा अन्वये गुन्हा दाखल केल्याची घटना २६ डिसेंबर रोजी घडली.



दि. २६ डिसेंबर रोजी दहशतवाद विरोधी पथक सोलापूर युनिटला मोहोळ तालुक्यातील चिंचोली एम.आय.डी.सी. येथे बांग्लादेशी नागरिक अनाधिकृत रित्या वास्तव्य व नोकरी करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार दहशतवाद विरोधी पथक सोलापूर युनिट व मोहोळ पोलीस ठाणे यांच्या टीमने संयुक्तिकरित्या मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार चिंचोली एमआयडीसीतील कंपनीमधील कामगारांसाठी राहण्याकरता बांधलेल्या खोल्यांमध्ये जाऊन खात्री केली. त्यामध्ये चंचल विष्णु देव उर्फ विश्वनाथ रॉय उर्फ पहन वय २९ व रजा हुजूरअली हुसेन वय-३८ दोघे रा. कटला गाव तहसील कटला, जिल्हा दिनासपूर, बांग्लादेश हे बेकायदेशीर राहत असल्याचे स्पष्ट झाले.

### एजंटाकडून बनवून घेतले आधारकार्ड

अटक करण्यात आलेल्या तिन्ही बांग्लादेशी नागरिकांकडे भारत देशामध्ये येण्याकरता लागणारा पासपोर्ट अथवा कागदपत्रे नव्हती, याबाबत पोलिसांच्या पथकाने त्यांच्याकडे विचारणा केली असता मोबाईल मध्ये आधार कार्ड असल्याचे सांगून आधार कार्ड दाखवले व ते सोलापूर मधून एजंटाकडून बनवून घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांचे पथक तपास करत आहे.

पोलिसांच्या पथकाने चंचल रॉय याच्याकडे अधिक चौकशी करत बांग्लादेश येथील आणखी कोणी साथीदार आहेत काय ?अशी विचारणा केली असता त्याने जवळच्याच एका दुसऱ्या कंपनीमध्ये एक साथीदार असल्याचे सांगितले. पोलिसांच्या पथकाने तात्काळ त्या ठिकाणी जाऊन तेथील कामगारांच्या राहण्याच्या खोलीत असलेल्या मीनल शनीचेरा टुडू वय -३० वर्ष रा. फुलयोनी, हॅमरास, डगापाडा, तहसील कटला, जिल्हा दिनासपुर, बांग्लादेश याला ताब्यात घेतले.

याप्रकरणी गुरुवारी रात्री उशिरा मोहोळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून याबाबतची फिर्याद पोलीस हेडकॉन्स्टेबल गोपाळ साखरे यांनी दिली. तिन्ही अटक करण्यात आलेल्या बांगलादेशी नागरिकांना मोहोळ येथील न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना एक दिवसाची पोलीस कोठडी सुनावली आहे. सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हेमंत शेडगे, दहशतवाद विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक सिद्धार्थ कदम, सहाय्यक पोलीस निरीक्षक अंजना फाळके पोलीस हेड.कॉ. संतोष येळे, पोलीस हेड.कॉ. धनंजय जावळे, नितीन जावळे नागेश उडानशिवे, रामचंद्र जाधव व मोहोळ पोलीस ठाण्याचे पोलीस हेड.कॉ. गोपाळ साखरे, पोलीस कॉ. आनंद डौले यांच्या पथकाने केली.

## राज्याच्या तिजोरीत खडखडाट,

### डिसेंबरच्या पगारासाठी शिक्षकांना वाट पाहावी लागणार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राज्याच्या तिजोरीत खडखडाट असल्याने प्राथमिक, खासगी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांवरील शिक्षकाच्या पगारासाठी पैसा नसल्याची वस्तुस्थिती समोर आली आहे. त्यामुळे आता शिक्षकांना डिसेंबरच्या पगारासाठी नववर्षात काही दिवसांची वाट पाहावी लागणार आहे. रखडलेले प्रकल्प, शासकीय योजनांसाठीचा निधी, 'लाडक्या बहिणीं'साठी पैसे द्यायला तिजोरीत पुरेसा पैसा नाही. त्यामुळे शिक्षकांच्या पगारासाठी अजूनपर्यंत शासनाकडून अंशदान वितरित झालेले नाही.



शिक्षकांच्या पगारासाठी वेतन अधीक्षकांकडे प्रत्येक महिन्याच्या साधारणतः (पान 2 वर..)

## देशमुख हत्या प्रकरणातील मास्टरमाईंडचा शोध लावा

### मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी मुख्य आरोपी वाल्मीक कराड याला तत्काळ अटक करावी आणि कराड याला पाठीशी घालणाऱ्या मंत्री धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी तसेच या घटनेमागील मास्टर माईडचा शोध घेऊन त्याच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली. बीड जिल्ह्यात दहशत माजविणारा वाल्मीक कराड सुदर्शन घुले व विष्णू चाटे व अन्य साथीदार यांची संघटित गुन्हेगारी टोळी असून याचा प्रमुख वाल्मीक कराड आहे. कराड व टोळीविरुध्द बीड जिल्ह्यात खून, खुनाचा प्रयत्न करणे,स्वतःच्या फायद्यासाठी लोकांचे अपहरण करून खंडण्या उकळणे यासारखे गंभीर स्वरूपाचे ३२ गुन्हे दाखल आहेत. कराड याच्या दहशतीमुळे त्याच्याविरुध्द तक्रार देण्यास कोणीही पुढे येत नाहीत.पवनचक्की कंपनीकडून करोडोंची खंडणी घेण्याचा कराडचा प्रयत्न मस्साजोगचे सरपंच संतोष



देशमुख व ग्रामस्थांच्या विरोधामुळे फसला होता. त्यावेळी कंपनीच्या सुरक्षा रक्षकांस कराडच्या गुंडांनी मारहाण करून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. याबाबत पोलिसांत तक्रार देऊनसुध्दा पोलिसांनी राजकीय दबावाला बळी पडून कोणतीच

कारवाई केली नाही.बीडचे पालकमंत्रिपद फडणवीस यांनी स्वीकारावे बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येतील मारेकऱ्यांना तत्काळ पकडावे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्रिपद स्वीकारावे, अशी मागणी मराठा क्रांती मोचार्चे समन्वयक अनंत जाधव यांनी केली. जाधव म्हणाले, मस्साजोगचे सरपंच देशमुख यांची निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बीडचे पालकमंत्रिपद स्वीकारल्यास वाल्मीक कराडची दहशत कमी होईल. ही दहशत कमी झाल्यास बीड हे बिहारमध्ये नसून महाराष्ट्रात आहे, हे लक्षात येईल असेही जाधव म्हणाले. संतोष देशमुख यांच्या हत्येमागचा मास्टरमाइंड वाल्मीक कराड असल्यामुळे त्यास मुख्य आरोपी करावे. देशमुख हत्येमुळे कराड व टोळीची दहशत महाराष्ट्रभर गेली. त्यामुळे वाल्मीक कराडच्या गुन्हेगारी कृत्यांना पायबंध घालणे गरजेचे यावेळी मराठा क्रांती मोचार्चे आहे. वाल्मीक कराडवर समन्वयक दिलीप कोल्हे, दास मोक्काअंतर्गत कारवाई करण्याचे शेळके, सुनील रसाळे, अमोल आदेश द्यावेत, असे मराठा क्रांती शिंदे, श्रीकांत घाडगे, प्रताप मोर्चाच्या निवेदनात म्हटले आहे. चव्हाण, अनंत जाधव, संजय शिंदे, शशी थोरात, योगेश पवार, शेखर फंड महेश देवकर, गणेश शिंदे, संजय घाडगे उपस्थित होते.

## अखिल भारतीय वारकरी मंडळातर्फे रविवारपासून अखंड हरिनाम सप्ताह

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय वारकरी मंडळ, सोलापूर शहर तर्फे रविवार दि. 29 डिसेंबर 2024 ते दि. 5 जानेवारी 2025 या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती मंडळाचे मुख्य सचिव ह.भ.प.गणेश महाराज शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. जगद्गुरू श्री. संत तुकाराम महाराज यांच्या सदेह वैकुंठगमन त्रिशतकोत्तर अमृत महोत्सव वर्षपूर्ती सोहळा व श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५१ व्या राज्याभिषेक दिनानिमित्त वै. दा. का. थावरे भाऊ यांच्या स्मरणार्थ अखिल भारतीय वारकरी मंडळ राष्ट्रीय अध्यक्ष ह. भ. प. प्रकाश महाराज बोधले, जिल्हा अध्यक्ष ह.भ.प. डॉ. किरण महाराज बोधले शहर अध्यक्ष ह.भ.प. सुभाष महाराज शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जुनी मिल कंपाऊंड, भैय्या चौक, सोलापूर येथे या सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.


या सप्ताहामध्ये काकडा आरती, श्री. संत तुकाराम महाराज गाथा भजनी पारायण, संगीत भजन, हरिपाठ, प्रवचन हरिकिर्तन, हरिजागर अशा अध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

याशिवाय संत महात्मे, संत परंपरेतील वंशज यांची किर्तनरूपी सेवा आयोजित करण्यात आली आहे. दि. २९ डिसेंबर रोजी ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले, ३० रोजी ह.भ.प. जगन्नाथ महाराज पाटील, ३१ रोजी ह.भ.प. बंडा तात्या कराडकर, १ जानेवारी ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, २ रोजी ह.भ.प. लक्ष्मण महाराज चव्हाण, ३ रोजी ह.भ.प. कान्होबा महाराज देहूकर, ४ रोजी ह.भ.प. योगीराज महाराज गोसावी यांची दररोज रात्रौ ७ ते ९ कीर्तने होणार आहेत. शनिवार दि.४ जानेवारी रोजी दुपारी ३ ते ६ पर्यंत सोलापूर शहरामध्ये दिंडी प्रदक्षिणा होणार आहे. तसेच दि.५ जानेवारी सकाळी १० ते १२ ह.भ.प. डॉ. जयवंत महाराज बोधले यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता होणार आहे.

तरी सोलापुरातील सर्व वारकरी भाविक भक्तांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष सुरेश भोंगे महाराज, भास्कर पवार, ज्ञानेश्वर जरग, दिगंबर फंड, लहू गायकवाड, आदिनाथ जावळे आदी उपस्थित होते.

## उजनीतून सोलापूरसाठी भीमा नदीत सोडले पाणी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर, मंगळवेढा, सांगोला या नगरपालिकांसह सोलापूर शहरासाठी उजनी लाभक्षेत्र प्राधिकरणाने गुरुवारी सकाळी नऊ वाजता उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडले. एक आठवड्याच्या आत हे पाणी दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज बंधारा भरून चिंचपूर बंधाऱ्यापर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या टाकळी येथील भीमा नदीच्या पात्रात पाण्याचा साठा कमी झाल्याने सोलापूर शहरासाठी उजनीतून भीमा नदीत पाणी सोडण्याची मागणी सोलापूर महापालिकेने जलसंपदा विभागाकडे केली होती. त्यानुसार वरिष्ठांच्या आदेशानुसार पाणी सोडण्याची प्रक्रिया उजनी लाभक्षेत्र प्राधिकरणाने सुरू केली आहे. गुरुवारी सकाळी नऊ वाजता १६०० क्युसेक या वेगाने पाणी सोडण्यात आले. नंतर हळूहळू पाण्याचा विसर्ग वाढविण्यात आला. रात्री नऊ वाजता साडे चार हजारांचा विसर्ग करण्यात आला. भीमा नदी पात्रात अजून पाणी असल्याने पाणी वेगाने पुढे सरकणार आहे. एकआठवड्याच्या आत हे पाणी औज बंधाऱ्यात दाखल होऊन टाकळी व चिंचपूर बंधाऱ्यापर्यंत पोहोचेल, असे जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. औज बंधाऱ्यात चार मीटर पाणी साठविल्यानंतर किमान दोन महिन्यांपर्यंत सोलापूरच्या नागरिकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न दूर होणार आहे. जानेवारी अखेरपर्यंत उजनी - सोलापूर दुहेरी जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यास या योजनेतून शहराला साठा कमी झाल्याने पाणीपुरवठा होईल.

## विमान कंपनी व प्रशासनाकडून पेट्रोल पंपाची मागणी करून सोलापूरकरांची केली चक्क फसवणूक

### खुद्द मुरलीधर मोहोळ यांच्या पुण्यात टँकरने विमानात भरले जाते इंधन

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** २३ डिसेंबर पासून सोलापूर ते गोवा व मुंबई अशी सुरू होणारी फ्लाय ९१ या विमान कंपनीची विमानसेवा कंपनीने सोलापूर विमानतळावर इंधन भरण्यासाठी पेट्रोल पंप नाही व धुके आहे.

हो कारणे देऊन चक्क तमाम सोलापूरकरांची फसवणूकच केलेली आहे.आज सुद्धा पुणे येथील नवीन आंतरराष्ट्रीय विमान टर्मिनल वर विमानांमध्ये चक्क टँकरच्या साह्याने इंधन भरले



जाते. नागरी उड्डयन राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या पुण्यात जर विमानतळावर पेट्रोल पंप नाही व धुके नाही तर सोलापूर मध्ये ही कारणे पुढे करून या विमान कंपनीने व प्रशासनाने सर्व सोलापूरकरांची दिशाभूल केलेली आहे हे उघड झाले आहे. निवडणुकीच्या तोंडावर विमानसेवा सुरू करणार अशा अफवा पसरवून मते मिळवण्याचा हा एक अत्यंत लाजिरवाणा प्रकार मुरलीधर मोहोळ व राज्यकर्त्यांनी केलेला आहे.

या गोष्टीचा जाब लोकप्रतिनिधींना व प्रशासनाला कोण विचारणार? असे सोलापूर विचार मंचचे डॉ.संदीप आडके यांनी सांगितले.

## नववर्षानिमित्ताने मद्य विक्री अनुज्ञप्ती वेळेत शिथिलता

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नववर्षाच्या निमित्ताने शासनाने अनुज्ञप्त्याच्या बंद करण्याच्या वेळेत सुट देवून एफएल-2. एफएल-3, सीएल-3, एफएलबिआर-2, एफएलडब्लू-2, एफएल-4 (क्लब अनुज्ञप्ती). नमुना ई (बिअर बार) व ई-2 अनुज्ञप्या च्या निर्धारित वेळेपेक्षा अधिककालावधीसाठी उघड्या ठेवण्यासाठी मुंबई दारुबंदी कायदा 1949 चे कलम 139 (1) (सी) व कलम 143 (2) (एच 1) (iv) अन्वये शासनाने मंजुरी दिलेली आहे. सोलापूर जिल्ह्यातील एफएल-2 (विदेशी मद्य किरकोळ विक्रीचे दुकान), एफएलडब्लु-2, एफएलबिआर-2 (बंद बाटलीतुन बिअर विक्री) रात्री 1.00 वाजे पर्यंत, एफएल-3 (परवाना कक्ष), एफएल-4 (क्लब अनुज्ञप्ती), ई-2 पहाटे 5:00 वाजेपर्यंत व सीएल-3 महानगरपालिका तसेच 'अ' व 'ब' वर्ग नगरपालिका क्षेत्रातील अनुज्ञप्तीसाठी 1:00 वाजेपर्यंत सुरु राहतील.

## कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज ता. माळशिरस जि.-सोलापूर

**लिलाव नोटीस**

कृषि उत्पन्न बाजार समिती, अकलूज जिल्हा सोलापूर या संस्थेचे वाहन महिंद्रा (एक्स.यू.व्ही.५००) एम.एच.४५/ए.डी- ५००० मॉडेल २०१८ हे वाहन विकणे आहे. इच्छुकांनी दिनांक ०२/०१/२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता लिलावाचे वेळी उपस्थित रहावे. लिलावासंबंधी अधिक माहिती, नियम व अटी बाजार समितीचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

स्थळ:- शंकरराव मोहिते मार्केट यार्ड, अकलूज, ता.माळशिरस, जि.सोलापूर

सही/-

सभापती

कृषि उत्पन्न बाजार समिती,

अकलूज, ता.माळशिरस, जिल्हा-सोलापूर

## संपादकीय

# नो डिटेंशन

केंद्र सरकारने 'नो डिटेंशन' धोरण समाप्त करण्याची घोषणा केली आहे. या धोरणानुसार इयत्ता पाचवी आणि आठवीसाठी कोणत्याही विद्यार्थ्यार्ला नापास केले जात नव्हते. बर्याच व्यावहारिक समस्या आणि नकारात्मक बाबी समोर आल्यामुळे सरकारने हे धोरण रद्द करण्याचा निर्णय घेतला.सरकारच्या निर्णयामुळे पुन्हा दशक-दीड दशकापूर्वी झालेल्या चचेर्ला तोंड फुटले आहे. विद्यार्थ्यांचे नक्की हित कशात आहे, धरसोडीच्या वृत्तीमुळे आपण पिढ्या तर वाया घालवत नाही ना याचाही सगळ्यांनी विचार करण्याची नितांत गरज आहे. 'शिक्षणाचा अधिकार' कायद्यानुसार 14 वर्षापर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांना शिक्षण मोफत आणि बंधनकारक आहे. त्याची जबाबदारी सरकारवरच आहे. विद्यार्थी केवळ शाळेत उपस्थित राहणे महत्त्वाचे नाही, तर मुलगा किंवा मुलगी शाळेत आल्यावर खरेच ज्ञान ग्रहण करतात का, त्यांना जे शिकवले जाते आहे ते त्यांना समजते आहे का, हे जाणून घेण्याचे निकष पूर्वीपासूनच चचेर्चा विषय राहिले आहेत.

त्यावर विविध मतांतरे असली तरी विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेणे हाच विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याचा उपाय असल्याचे बहुतांश लोकांनी मान्य केले आणि ते स्वीकारले गेले. पाश्चिमात्य देशांत विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीला चालना आणि प्रोत्साहन देण्याचे उपाय अवलंबले जातात, पण ते पुढच्या टप्प्यात. येथे विषय आहे मूलभूत किंवा पायाभूत शिक्षणाचा आणि ते घेतलेच गेले पाहिजे अशी अपेक्षा आहे. भारतात जेवढी विशालता आहे, तेवढीच विषमताही आहे. ही विषमता आर्थिक, सामाजिक आणि अन्य सर्वच स्तरांवर आढळून येते. सरकारी शाळा आणि खासगी शाळा ही आणखी एक वेगळीच विषमता आहे. तूर्त ती बाजूला ठेवून विचार केला तर असे आढळते की प्रत्येक विद्यार्थी अथवा विद्यार्थिनीच्या घरात शिक्षणाला पूरक आणि प्रोत्साहन देणारे वातावरण नसते. आर्थिक अक्षमता हे त्यामागचे मुख्य कारण. अनेक मुलांना दप्तर पाठीवर घेण्याच्या वयातच कुटुंबाच्या भरणपोषणाला हातभार लावण्याचाही भार वाहावा लागतो. काहींना हा भार माता-पित्याला मदत व्हावी यापुरता असतो तर काही अगदीच कमनशिबी असतात. त्यांच्यावर पित्याच्या किंवा दोघा पालकांच्या अनुपस्थितीच्या पश्चात आपल्या भावंडांची जबाबदारी आली असते. भाकरीचा चंद्र त्यांच्यासाठी महत्त्वाचा असतो. त्यातूनही कोणी ज्ञानार्जनासाठी कष्ट घेत असेल तर तो स्पर्धेत मागे पडणारच आहे. अन्य विद्यार्थ्यांच्या तुलनेत तो कच्चा राहतो. परीक्षेची अन् त्यात नापास होण्याची भीती यामुळेही अशा वगार्तील अनेक विद्यार्थी शाळेत जात नाहीत किंवा जाणे सोडून देतात. 'नो डिटेंशन' धोरण आणण्यामागचा हेतू असा होता की विद्यार्थ्यार्ला पास अथवा नापास घोषित करण्याऐवजी त्याला पुढे नेले जावे. हे करत असताना त्याच्यातील त्रुटींचा किंवा उणिवांचा शोध घेण्यासाठी त्याचे सतत मूल्यांकनही केले जावे, पण परीक्षा या स्वरूपात ते नसावे. अडचण अशी झाली की ज्या भावनेने हे लागू केले गेले होते, त्याबाबत काही सकारात्मक बाबी नंतरच्या काळात समोर आल्या नाहीत. त्यालाही दोन गोष्टी कारणीभूत. एक सरकारी शाळांमधील शिक्षकांकडे शिकवणे सोडले तर इतर अनेक जबाबर्दाया असतात. त्यांच्या तपशिलात आता जायला नको.

मुलांचे मूल्यांकन ते काय करतील आणि मुळात जर ते आपल्या पेशाकडे केवळ नोकरी म्हणून पाहात दिवस भरत असतील, तर त्यांच्याकडून फार अपेक्षा करण्यात अर्थ नाही. खासगी शाळांमधील स्थिती सरकारी शाळांच्या तुलनेत काहीशी चकचकीत असली तरी आणि येथील शिक्षक पॉलिश्ड दिसत असले तरी ते बिचारेही संस्थाचालकांच्या लहरीनुसार कामाला जुंपलेले कंत्राटी कामगार झाले आहेत. मुलांना किती येते आणि किती उमजते यापेक्षा तुम्ही बाहेरच्या जगात तुमची ही मुले कशी प्रेझेंट करतात यात या शिक्षकांना जुंपल्यामुळे त्यांना त्यांचे जे मूळ काम आहे त्याचाच तिटकारा उत्पन्न झाला आहे. यातून जे चित्र सुरुवातीच्या पाच-सात वर्षांत समोर आले.

त्यामुळे राज्यांचे शिक्षण विभागही हबकले व 'नो डिटेंशन' धोरण समाप्त करण्याची मागणी निम्म्या राज्यांकडून केली गेली. सरकारनेही 2019 मध्ये कायद्यात दुरूस्ती करत हे धोरण सुरू ठेवायचे की नाही हा पर्याय राज्यांवरच सोपवला व अखेर स्वतःच धोरण समाप्त केले. विद्यार्थ्यांना आता परीक्षा द्यावी लागणार आहे. ते नापास झाले तर सुधारणा करून पास होण्याची संधी त्यांना मिळेल. यातही ते नापास झाले तर त्यांना त्याच वर्गात पुन्हा बसावे लागेल. यामुळे केवळ विद्यार्थ्यांवरच नव्हे तर शिक्षकांवरही दबाव राहील. शिकणे आणि शिकवणे या दोन्ही बाबत अधिक सतर्कता बाळगावी लागेल.

देशातील शिक्षणाचा स्तर आणि विद्यार्थ्यांचे ज्ञान यांची चाचपणी विविध सर्वेक्षणांद्वारे केली जात असते आणि त्यातून अनेक धक्कादायक आकडेही समोर येतात. गळतीचे प्रकार किंवा परीक्षेच्या वेळी अन्य चुकीच्या मागार्चा अवलंब करून पास होण्याचे प्रकार वाढीस लागण्यामागची कारणेही समोर येत असतात. त्यावर सरकारचा हा निर्णय फायदेशीर ठरावा. कारण मुलांना व पालकांनाही सुरुवातीलाच शिक्षणाबाबत गांभीयार्ची जाणीव करून दिली, तर ते वेळीच बदल घडवू शकतील. आताच्या बदलामुळे पुन्हा गळती वाढू शकते अशी भीतीही आहेच. तथापि, कुठलाही विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर पडणार नाही याची खबरदारी सगळ्यांना घ्यावी लागेल.

पान १ वरून

## राज्याच्या तिजोरीत खडखडाट....

२५ तारखेपर्यंत निधी उपलब्ध झाल्यावर १ ते ५ तारखेपर्यंत पगार वितरित होतो. पण, आता २७ तारीख उजाडली तरीदेखील सरकारकडून पगारासाठी निधी मिळालेला नाही. राज्यातील जिल्हा परिषदांच्या शाळांमधील शिक्षक, खासगी अनुदानित प्राथमिक शाळा, अनुदानित खासगी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या जवळपास साडेचार लाखांपर्यंत आहे.

शालेय शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी दरवर्षी शासनाला तिजोरीतून ६५ ते ७० हजार कोटी रुपये (दरमहा सरासरी पाच हजार ५०० कोटी) द्यावे लागतात. पण, सध्या तिजोरीची स्थिती बिकट झाली असून २०२४-२५ या आर्थिक वर्षात १ लाख कोटी रुपयांचे कर्ज घेण्यासाठी राज्य सरकारने 'आरबीआय' ची मंजुरी घेतली. त्यातील ६० हजार कोटींहून अधिक रुपयांचे कर्ज यापूर्वीच उचलले आहे.

सोलापूरचे खासगी प्राथमिक शाळांमधील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अधीक्षक विठ्ठल ढेपे म्हणाले, पावणेतीन हजार शिक्षकांसाठी दरमहा २५ कोटी रुपयांचा निधी लागतो. तो निधी २५ तारखेपर्यंत आल्यास ५ तारखेपर्यंत पगार करता येतो.

वेतन अधीक्षक (माध्यमिक) दत्तात्रेय मुंडे म्हणाले, सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या १५ हजारांपर्यंत आहे. त्यांच्या पगारासाठी दरमहा १०५ कोटी रुपये लागतात. २५ तारखेपर्यंत पगारासाठी अंशदान अपेक्षित होते. पण अजून निधी मिळालेला नाही. त्यामुळे पगारासाठी काही दिवसांचा विलंब लागू शकतो.

प्राथमिक शिक्षणाधिकारी म्हणाले, जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ९ हजार १०० शिक्षक असून त्यांच्या पगारासाठी दरमहा ८५ कोटी रुपये लागतात. पगारबिले तयार आहेत, निधी आल्यावर शिक्षकांचे वेतन होईल.

# देशासह राज्यातील वनक्षेत्राताची घट अत्यंत चिंताजनक

राष्ट्रीय वन अहवाल २०२३ च्या माहितीनुसार वनक्षेत्राच्या बाबतीत देशासह राज्याची परिस्थिती अत्यंत चिंताजनक स्थितीत येवून ठेपली आहे.कारण देशात फक्त २१ टक्के व राज्यात फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचा खुलासा राष्ट्रीय वन अहवालात केला आहे ही अत्यंत गंभीर व धोकादायक स्थितीत नेणारी बाब आहे.आज निसर्गावर सर्वच काही अवलंबून आहे. आज निसर्ग आहे म्हणून सृष्टी आहे. निसगार्ची संपूर्ण जळमुळ वनक्षेत्रावर अवलंबून असते.वनक्षेत्र म्हणजेच वृक्ष,परंतु आज वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजातीने स्वतःच्या स्वाथार्साठी कुऱ्हाड चालवून घनाघाती प्रहार केला आहे.आज देशाचा विचार केला तर फक्त २१ टक्के वनक्षेत्र म्हणजे मानवजातीसह संपूर्ण जीवसृष्टीसाठी धोक्याची घंटा आहे.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून ग्लेशियर वितळणे, भुकंप, ज्वालामुखीचा उद्रेक,भुस्खनन, अती उष्णता, अती पाऊस, सुनामी, समुद्राची पातळी वाढणे अशा भयावह घटना दिवसेंदिवस वाढतच आहे. आजच्या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय नियमांनुसार प्रत्येक देशाचे वनक्षेत्र कमीत कमी ३३ टक्के असने गरजेचे आहे.परंतु आज भारतात फक्त २१ टक्के वनक्षेत्र शिल्लक असल्याचे सांगितले जाते व महाराष्ट्राचा विचार केला तर फक्त १६ टक्के वनक्षेत्र शिल्लक आहे.म्हणजेच राज्यासह देशातील वनक्षेत्र भरपूर पिछाडीवर आहोत.महाराष्ट्रात फक्त १६ टक्के वनक्षेत्र म्हणजे मोठी धोक्याची घंटा आहे. देहरादून येथील "फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडिया" या संस्थेने नुकताच २०२३ चा राष्ट्रीय वन अहवाल (आयएसएफआर) दिल्ली येथील वन आणि पर्यावरण मंत्रालयाकडे सादर केला.हा अहवाल देशातील वनसंपत्ती आणि संसाधनावरील प्राथमिक माहितीच्या आधारावरचा मूल्यांकन अहवाल मानला जातो.

वनक्षेत्राच्या बाबतीत देशातील राज्यात समतोल नसल्याने वनक्षेत्र घटतांना दिसते. आज आपण पहाले तर देशातील आंध्रप्रदेश, कर्नाटक, केरळ,ओरिसा, तेलंगणा, या राज्यातील वनक्षेत्र गेल्या दोन वर्षात वाढले आहेत.तर घनदाट जंगलाच्या बाबतीत ज्या राज्यांची गणणा होते अशा मिझोराम, नागालँड, अरूणाचल प्रदेश, त्रिपुरा, मेघालय या राज्यातील वनक्षेत्र घटले आहे ही चिंतेची बाब आहे. इतर राज्याच्या तुलनेत जर महाराष्ट्राचा विचार केला वनक्षेत्राच्या बाबतीत अत्यंत निचकांक असुन गंभीर परिस्थितीत असल्याचे दिसून येते.त्यामुळे वनक्षेत्राच्या बाबतीत सरकारने गांभीयार्ने लक्ष देण्याची गरज आहे. कारण वनक्षेत्रावर संपूर्ण मानवजाती, पशुपक्षी व जीवजंतू यांची दिनचर्या अवलंबुन असते.त्यामुळे वनक्षेत्र सुरक्षित तर संपूर्ण जीवसृष्टी सुरक्षिर हा मुलमंत्र सर्वांनीच अंगीकारा पाहिजे.आज संपूर्ण देशाचा विचार केला तर वनक्षेत्र ३३ टक्क्यांपर्यंत आणण्यासाठी १२ टक्के वनक्षेत्र वाढविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी सरकारने व सामाजिक संघटनांनी पुढाकार घेतला पाहिजे.त्याचप्रमाणे आज राज्यात ३३ टक्क्यांपर्यंत वनक्षेत्र आणण्यासाठी १७ टक्के वनक्षेत्र वाढविण्याची मोठी जबाबदारी सरकारची स्विकारली पाहिजे.वनक्षेत्र वाढले नाही तर दिवसेंदिवस बदलत्या हवामानात आणखी भर पडुन भयावह परिस्थिती निर्माण होऊ शकते याला नाकारता येत नाही. त्यामुळे वृक्ष लागवड काळाची गरज आहे. आज घटत्या वनक्षेत्रामुळे जंगली पशुपक्षी याचे हाल बेहाल होत आहे व त्यांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.आपण रोज मिडियाच्या माध्यमातून पहात असतो की, गावात, शहरात, कोणाच्या घरात, रोडवर हिंसक प्राणी (वाघ, बिबट्या, अस्वल इत्यादी) मोठ्या प्रमाणात वावरतांना दिसतात.याला संपूर्ण मानवजाती जबाबदार आहेत.

देशात हत्ती कर्नाटक व ओरिसा राज्यात सर्वाधिक आहे म्हणजेच जगभरात असणाऱ्या हत्ती पैकी ६० टक्क्यांहून अधिक हत्ती भारतात आहे. परंतु जंगल कटाईमुळे व वनक्षेत्राच्या घटत्या परिणामामुळे हत्तीचे कळप आपल्याला इतरत्र राज्यात येतांना दिसतात.यामुळे या महाकाय प्राण्यांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे.जंगल कटाईमुळे वन्यप्राण्यांची तस्करी मोठ्या प्रमाणात वाढली आहे.ओडिशात गेल्या ११ वर्षात ८५७ हत्तींचा मृत्यू अपघात, आजार, शिकार, विजेता झटका यामुळे त्यांचा मृत्यू झाला.अशाप्रकारे वन्यप्राण्यांवर मानवी अत्याचार वनक्षेत्र घटल्याने होत असल्याचे दिसून येते.घटत्या वनक्षेत्रामुळे हवामानात बदल होवून देशातील प्रदुषणाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. अमेरिकेच्या हेल्थ इफेक्ट इन्स्टिट्यूटने "स्टेट ऑफ ग्लोबल एअर २०२४" हा अहवाल सादर केला आहे.त्यात दावा करण्यात आला आहे की भारतातील वायुप्रदूषण अतिशय चिंताजनक पातळीवर पोहोचले आहे. वायुप्रदुषणामुळे जगभरातील मृत्यूच्या तुलनेत २५ टक्के मृत्यू भारतात होतात म्हणजेच भारत वायुप्रदूषणच्या बाबतीत अग्रेसर असल्याचे दिसून येते आणि ही गंभीर बाब आहे याला रोखण्यासाठी वनक्षेत्र वाढविण्याची नितांत गरज आहे व संपूर्ण स्तरातुन वृक्षलागवड मोहीम युद्धपातळीवर राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करणे गरजेचे आहे. जय हिंद!



रमेश कृष्णराव लांजेवार
(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.


# महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्व हरपले

भारताचे माजी पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग यांचे गुरुवार दिनांक २६ डिसेंबर रोजी वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत आणि व्यासंगी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. त्यांनी देशासाठी जे योगदान दिले देश कधीही ते विसरणार नाही. त्यांच्या निधनाने भारताची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. आज भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था मानली जाते. याचे सर्व श्रेय डॉ मनमोहन सिंग यांनाच जाते कारण तीस बत्तीस वर्षापूर्वी ते देशाचे अर्थमंत्री असताना देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी जे क्रांतिकारी निर्णय घेतले त्यामुळेच देशाची अर्यव्यवस्था सुदृढ झाली आहे.

डॉ मनमोहन सिंग हे रूढ अथार्ने राजकारणी नव्हते तरीही त्यांनी समर्थपणे दहा वर्ष देशाचे नेतृत्व केले. त्यांनी देशासाठी दिलेले योगदान खूप महत्वाचे आहे. २६ सप्टेंबर १९३२ रोजी एका गरीब कुटुंबात डॉ मनमोहन सिंग यांचा जन्म झाला. ते लहान असतानाच त्यांचे मातृ छत्र हरपले. घरची परिस्थिती हालाखीची असूनही त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. पंजाब विद्यापीठातून आपले उच्च शिक्षण पूर्ण केल्यावर त्यांनी १९५७ साली केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयातून पहिल्या श्रेणीत पदवी मिळवली. त्यानंतर त्यांनी १९६२ साली ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या नफिल्ड महाविद्यालयातून अर्थशास्त्र विषयात डी फिल ही पदवी संपादन केली. उच्च शिक्षण घेऊन ते मायदेशात परतल्या वर त्यांनी पंजाब विद्यापीठ तसेच दिल्ली स्कूल ऑफ इकोनॉमिक्समध्ये प्राध्यापक म्हणून सेवा केली. अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. एक विद्यार्थीप्रिय प्राध्यापक अशी त्यांची ओळख होती. याच दरम्यान त्यांनी युएनसिटीडी सचिवालयात त्यांनी काम पाहिले. अर्थशास्त्रातील विद्वान व्यक्ती अशी त्यांची ख्याती जगभर पसरू लागली त्यामुळे १९७१ साली त्यांना वाणिज्य मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार ही जबाबदारी देण्यात आली. पुढील वर्षी म्हणजे १९७२ साली त्यांची अर्थ मंत्रालयात प्रमुख आर्थिक सल्लगार म्हणून नेमणूक झाली. अर्थ विभागाचे प्रमुख सल्लागार म्हणून त्यांची कामगिरी उल्लेखनीय राहिली. पुढे त्यांनी अर्थ मंत्रालयाचे सचिव, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर, पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार, विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष अशा महत्वाच्या पदावर त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या काळात त्यांनी जिनिव्हा येथील साऊथ कमिशनचे सरचिटणीस म्हणून काम पाहिले.



१९९० पासून भारतीय राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडत होत्या. राजकारण अस्थिर झाले होते. विश्वनाथ प्रताप सिंग यांचे सरकार पडले होते. चंद्रशेखर हे भारताचे पंतप्रधान बनले होते. भारताची अर्थव्यवस्था बिकट बनली होती. देश चालवण्यासाठी सरकारकडे पैसे नव्हते सरकारी तिजोरीत ठणठणाट होता म्हणून पंतप्रधान चंद्रशेखर यांनी देशाचे हजारो टण सोने जागतिक बँकेकडे गहाण ठेवले होते. केवळ भारतच नव्हे तर संपूर्ण जगातच आर्थिक मंदी आली होती. अनेक देश डबघाईला आले होते अशातच काँग्रेसने चंद्रशेखर यांचा पाठिंबा काढून घेतल्याने लोकसभेच्या निवडणुका लागल्या होत्या. निवडणूक प्रचार दरम्यानच राजीव गांधी यांची हत्या झाल्याने काँग्रेसचे सूत्रे पी व्ही नरसिंह राव यांच्याकडे आली. त्या निवडणुकीत काँग्रेसने सर्वाधिक जागा जिंकल्याने नरसिंह राव पंतप्रधान बनले. पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेताच कॅबिनेट सचिव नरेश चंद्र यांनी त्यांना आठ पानांचा अहवाल दिला. या अहवालात देशाची आर्थिक स्थिती अत्यंत वाईट असल्याचे नमूद करण्यात आले होते. अशा परिस्थितीत राव यांना अशा चेहऱ्याची गरज होती जो आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि त्यांच्या विरोधकांना भारत आता जुन्या मार्गावर जाणार नाही असा संदेश देऊ शकेल. त्यांनी त्यावेळी त्यांचे सल्लागार पी सी अलेक्झांडर यांना विचारले की अर्थ मंत्रालयासाठी आंतरराष्ट्रीय मान्यता असलेल्या व्यक्तींचे नावे सुचवा तेंव्हा पी सी अलेक्झांडर यांनी आय जी पटेल व डॉ मनमोहन सिंग यांची नावे सुचवली. आय जी पटेल यांची आई आजारी असल्याने ते भारतात येऊ शकणार नाही मात्र डॉ मनमोहन सिंग यांना संपर्क केल्यास देशहीतासाठी ते अर्थमंत्री होतील असे पी सी अलेक्झांडर यांनी पंतप्रधानांना सांगितले. लगेचच नरसिंह राव यांनी डॉ मनमोहन सिंग यांच्याशी संपर्क केला आणि तुम्ही माज्या मंत्रिमंडळात अर्थमंत्री होताल का ? असे विचारले. मनमोहन सिंग यांनी त्यास होकार दिला आणि डॉ मनमोहन सिंग भारताचे अर्थमंत्री बनले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी त्यांनी खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण धोरण आणले. अर्थमंत्री म्हणून त्यांनी देशाची अर्थव्यवस्था सुधारलीच नाही तर ती वेगवान केली. त्या काळात डॉ मनमोहन सिंग यांना जागतिक पातळीवर सर्वोत्कृष्ट अर्थमंत्री म्हणून संबोधले जात असे. त्यांनी जागतिक बँकेकडे गहाण ठेवलेले सोने परत आणले. देशाच्या तिजोरीत भर घातली. देशात परदेशी गुंतवणूक आणली त्यामुळे देशाची अर्थव्यवस्था तर सुधारलीच पण तरुणांना रोजगार देखील मिळाला. त्यांच्या उदारीकरणाच्या धोरणाला जगाने मान्यता दिली म्हणूनच त्यांना जागतिक उदारीकरणाचे जनक असे म्हणतात. १९९६ साली काँग्रेसचे सरकार गेल्यावर ते राज्यसभेत विरोधी पक्षनेते बनले. मे २००४ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले त्यावेळी सोनिया गांधी याच देशाच्या पंतप्रधान होतील असे सर्वांना वाटले पण सोनिया गांधींनी आपला आतला आवाज ऐकून पंतप्रधानपद नाकारले आणि डॉ मनमोहन सिंग यांची पंतप्रधानपदी निवड केली. त्यांच्या पंतप्रधानपदाच्या काळातही त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले . देशातील एकही व्यक्ती उपाशी झोपू नये म्हणून त्यांनी अन्न सुरक्षा सारखे महत्वाचे विधेयक आणले. सर्वांना रोजगार मिळावे म्हणून त्यांनी मनरेगा योजना आणली. त्यांच्या पंतप्रधान काळात परराष्ट्राशी भारताचे सौहादार्चे संबंध होते. त्यांच्याच काळात भारत आणि अमेरिका यांचे संबंध दृढ झाले. सर्वसामान्य जनतेच्या हिताचे अनेक निर्णय घेतल्यानेच जनतेने त्यांना दुसऱ्यांदा पंतप्रधान बनण्याची संधी दिली. २००४ ते २०१४ असे सलग दहा वर्ष ते भारताचे पंतप्रधान होते. सलग दहा वर्ष देशाचे पंतप्रधान राहूनही ते कायम नम्र आणि विनयशील राहिले. अहंकाराचा लवलेशही त्यांना शिवला नाही. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अर्थशास्त्रावर आधारित ग्रंथ लीहले. त्यांना अनेक पुरस्कारही मिळाले. त्यांना अनेक विद्यापीठांनी मानाची डॉक्टरेट दिली. देशाचा दुसरा सर्वोच्च पुरस्कार पद्मविभूषण त्यांना प्राप्त झाला. त्यांच्या निधनाने देशाने एक महान अर्थतज्ज्ञ, थोर विचारवंत, व्यासंगी व्यक्तिमत्त्व, अभ्यासक आणि थोर देशभक्त गमावला आहे. त्यांच्या कामाप्रती असलेला व्यासंगी आणि शैक्षणिक दृष्टिकोन, जनसामान्यांसाठी असलेली उपलब्धता व विनम्र आचारणामुळे ते कायम स्मरणात राहतील. डॉ मनमोहन सिंग यांना भावपूर्ण श्रद्धांजली!



श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

## प्रबोधन

# विद्यापीठे मुक्त । ज्ञानकेंद्रे व्हावी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण घेण्यासाठी परदेशात गेले, म्हणून तर महाराष्ट्राच्या आधुनिक शिक्षणाचा इतिहास त्यांच्या नावाने लिहिला जाईल, अशी डॉक्टरेट पदवी पहिल्यांदा त्यांना मिळवता आली. भारतात राहून डॉक्टरेट मिळवण्याचा प्रयत्न त्यांनी केला, असता तर मात्र भारतातील द्रोणाचार्यी मनोवृत्तीने त्यांना डॉक्टरेट मिळूच दिलीच नसती. एकलव्याच्या कथेतून गुरू पदावर कपटी गुरू कसे बसलेले असतात, हे दुर्दैवी सत्य तर कळतंच. पण त्याहून दुर्दैवी असं दुसरं एक सत्य असं की, बहुजन समाजाच्या शिक्षणाला अडथळ्याच्या शर्यतीचं स्वरूप देऊन त्या शर्यतीत बहुजन समाजातील माणसं अपयशी व्हावीत, अशी रचना या देशातील व्यवस्थेने(?) कशी केली आहे, हेसुद्धा कळतं. गुरूपदी आरूढ झाल्यावर प्राचीन भारतीय मानसिकता अत्यंत संकुचित होत होत द्रोणाचायार्चं वळण एकविसाव्या शतकातही गिरवू लागते आणि ज्ञानाथीर्चा केवळ अंगठा घेऊन तिचं समाधान होत नाही, तर ती ज्ञानार्थी व्यक्तीचं डोकंच नाहीसं करते!

भारतात १९४८मध्ये महात्मा जोतिराव फुले यांनी मागास जातींच्या मुलांसाठी शाळा काढल्यावर खऱ्या अर्थाने जनतेच्या शिक्षणाची सुरुवात झाली. वर्गकेंद्री शिक्षण (Class education) जनताकेंद्री (Mass Education) झालं. महात्मा जोतिराव हेच आधुनिक शिक्षणकार्याचे युगनिमार्ते ठरले आणि त्यांच्या कायार्तून योग्य तो बोध घेऊन ब्रिटिश सरकारने १८५७मध्ये कलकत्ता, मद्रास आणि मुंबई विद्यापीठ स्थापन करून शिक्षणाच्या त्यांच्या कायार्ला चालना देण्याचा प्रयत्न केला. परंतु, ब्रिटिशांचं शिक्षणकार्य मेकॉलेच्या पाझर सिद्धान्तानुसारच (Filteration theory) होतं. ते जोतिरावांच्या कार्यासारखं जनताकेंद्री नव्हतं; आणि आज दीडशे-पावणेदोनशे वर्षानंतरही विश्वविद्यालयांचा पाझरू-बाजारू सनातनीपणा (orthodoxy) नाहीसा झालेला नाही.

गेल्या शतकाच्या उत्तरार्धात काही शिक्षण आयोगानी विश्वविद्यालयीन शिक्षणकार्य अधिक प्रभावी आणि परिणामकारक होण्यासाठी काही विचार मांडले. डॉ. राधाकृष्णन आयोगानुसार 'विश्वविद्यालयाचं मुख्य काम प्रमाणपत्र वितरण करणं नसून विश्वविद्यालयीन चैतन्याची भावना वृद्धिंगत करून उच्च शिक्षणात वाव देणं, हे आहे.' पण पदवी पातळीपासून प्रत्येक ज्ञानाशाखेचे मार्ग इतर ज्ञानशाखांसाठी बंद होतात. उदाहरणार्थ, मराठी विषय घेऊन बी.ए. होणाऱ्यांना समाजशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेता येत नाही. पदव्युत्तर पातळीवर जो विषय असेल, त्याशिवाय दुसऱ्या ज्ञानशाखेत संशोधन करता येत नाही. याचा अर्थ, हे शिक्षण 'मुक्त नसून झापडबंद' आहे. ह्यात विनोद म्हणजे विषय निवडीत चोखंदळपणा करण्याची मुभा अगदी मुक्त विद्यापीठंसुद्धा देत नाहीत; परिणामी, त्यांचं मुक्त विद्यापीठ हे नाव अयोग्य ठरतं. राधाकृष्णन आयोग म्हणतो, 'विश्वविद्यालय स्वातंत्र्याचं माहेरघर असतं. यासाठी मानसिक, वैचारिक, स्वातंत्र्य प्राप्त करून देणं, हे विद्यापीठांचं कर्तव्य आहे.' पण आजच्या साचेबंद, झापडबंद, विद्यापीठात मागेल त्याला, मागेल त्या वर्गात प्रवेश मिळण्याची सोय आहे?

वास्तविक, विद्यापीठाची प्रत्येक ज्ञानशाखा जो जे वांछिल तो ते लाहो अशी निर्बंधमुक्त असली पाहिजे. विद्यार्थ्यांचे अंतःस्थ आणि बहिस्थ असे भेदही नकोत. कुणीही कोणत्याही ज्ञानशाखेत संशोधक का होऊ शकत नाही? संशोधक होण्यासाठी मार्गदर्शकाची काय गरज आहे? एकलव्यासारखे विद्यार्थी काय फक्त काल्पनिक महाभारतातच असतात? आणि भारतात आज ते नाहीत? मग त्यांनी स्वतःच्या बुद्धीने संशोधन करून प्रबंध सादर केला, तर त्यांना पीएच.डी. पदवी का दिली जात नाही? आपण विद्याक्षेत्रात स्वातंत्र्याचं माहेरघर म्हणून नावारूपाला येऊन डॉ. राधाकृष्णन यांचं शैक्षणिक उद्दिष्ट पूर्णतेला न्यावं, हे आजच्या संकोचशील, दुराग्रही, कायदेबद्ध, ज्ञानप्रसारद्वेष्ट्या विद्यापीठांना कधी आणि कसं कळणार? वास्तविक न मागता जसा मताधिकार मिळतो, तसा प्रत्येक ज्ञानार्थी विद्यार्थ्यार्ला विनाअट ज्ञानाधिकार दिला गेला पाहिजे. तरच राधाकृष्णन आयोगाच्या अपेक्षेप्रमाणे विद्यापीठं संशोधनकार्यात पूर्णपणे सहभागी होऊन मूलभूत संशोधन केंद्र म्हणून ती नाव आणि कीर्ती तर मिळवतीलच; शिवाय त्यांच्याकडून देशाच्या ज्ञानसागराला भरती आणण्याचं कार्यही घडेल.

'ज्ञानासारखं पवित्र जगात काही नाही,' 'ज्ञान हाच माणसाचा खरा डोळा होय,' 'विद्याधन हेच सर्व धनातील श्रेष्ठ धन असतं,' 'ज्ञान हेच खरं अमृत' अशी वचनं प्राचीन काळापासून या देशात रूढ आहेत, हे आजच्या विश्वविद्यालयांना माहीत नाही? ज्ञानाचं पावित्र्य ते मुक्त केल्यानेच वाढतं. विद्याधनाने प्रत्येकजण समृद्ध होतो. तरीही ज्ञानाचं अमृत वाटताना विद्यापीठं पंक्तिप्रपंच का करतात? राधाकृष्णन आयोग म्हणतो, 'आमचं अध्ययन तेजस्वी असो!' आज तर उत्तरोत्तर निमुळत्या वाटेने हा ज्ञानप्रवाह नेण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगापासून विद्यापीठं, पदव्युत्तर अध्ययन केंद्रे, महाविद्यालयं जिवाचा आकांत करीत आहेत. आपणही डॉक्टरेट व्हावे असे म्हणत म्हणत जगणारे कितीतरी दुर्दैवी एकलव्य शेवटी ही इच्छा मनातल्या मनात जिरवताहेत, हे वास्तव आमची विद्यापीठं कधी लक्षात घेणार? त्यासाठी-

ज्ञान मुक्त करा । जावो दिगंतरा
साचेबंद कारा । तोडा त्याची ॥१
हवे त्याला ज्ञान । मिळो मुक्तपणे
कशाला बंधने । ज्ञानाथीर्ला ॥२
लाभावेत पंख । प्रत्येका ज्ञानाचे
नभा स्पर्शण्याचे बळ यावे ॥३
भूतकाळ काळा । पडलाहे मागे
मन झाले जागे । पुढे चला ॥४
देशाला क्षितिजे। नवी दिसावीत
ज्ञानसाधनेत । अशा डुंबा ॥५
विद्यापीठे मुक्त । ज्ञानकेंद्रे व्हावी
वंचना न व्हावी । विद्यार्थ्यांची ॥६
इच्छी त्यास ज्ञान । मिळो इच्छेल ते
तोडा बंधनाते । जेथे तेथे ॥७
ज्ञानाविना भाग्य । देशाचे खुलेना
किमान विद्यापीठांना । कळू द्या हो ।।८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# 30 व 31 डिसेंबर रोजी कोपरखैरणे येथे ग्रंथोत्सवाचे आयोजन

ठाणे, (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने 'ठाणे ग्रंथोत्सव 2024' चे आयोजन करण्यात आले आहे. हा भव्य ग्रंथोत्सव दि.30 व 31 डिसेंबर 2024 रोजी ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे, नवी मुंबई येथे पार पडणार आहे. या ग्रंथोत्सवाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून वनमंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक व लोकसभा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हे असतील.

ग्रंथोत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम पुढीलप्रमाणेः

सोमवार, दि.30 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 9 वाजता ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम नवी मुंबई महानगरपालिका परिमंडळ-2चे उपायुक्त डॉ.कैलास गायकवाड आणि प्रा.माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशीचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांचा सहभाग असणार आहे. सकाळी 11 वाजता वनमंत्री गणेश नाईक यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न होणार आहे. दुपारी 2 ते 4 या कालावधीत भारतीय संविधान 'माझा अभिमान' या विषयावरील परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. या परिसंवादात सेवानिवृत्त शासकीय अधिकारी ॲड. बाबुराव हंद्राळे, सेवानिवृत्त न्यायाधीश ॲड. शरद मडके, माध्यम आणि विधी सल्लागार, राजकीय विश्लेषक, ज्येष्ठ पत्रकार डॉ.विलास पवार यांचा सहभाग असणार आहे. दुपारी 4 ते 5:30 या कालावधीत 'शब्दांच्या गावा जावे' हा परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. यामध्ये दूरदर्शन मुंबईच्या श्रीमती दिपाली केळकर यांचा सहभाग असणार आहे. सायंकाळी 5:30 ते 6:30 या कालावधीत 'कथाकथन' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष साहित्यिक चांगदेव काळे असणार आहेत तर साहित्यिक आदित्य देसाई, वसुंधरा घाणेकर आणि रामदास खरे यांचा सहभाग असणार आहे.

मंगळवार, दि.31 डिसेंबर 2024 रोजी सकाळी 10 ते 11:30 या कालावधीत संगीतवर्षा कला प्रतिष्ठान प्रस्तुत 'गाथा शिवकालीन इतिहासाची' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 11:30 ते 01 या कालावधीत 'अभिजात मराठी भाषा ज्ञानभाषा कशी बनेल?' या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक व मराठी अभिजात भाषा समितीचे अध्यक्ष प्रा. रंगनाथ पठारे असणार आहेत तर ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे यांचा सहभाग असणार आहे. दुपारी 03 ते 4:30 या कालावधीत 'क-कवितेचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ कवी अरुण म्हात्रे असणार आहेत तर साहेबराव ठाणगे, रवींद्र पाटील, स्वाती शिवशरण, नारायण लांडगे पाटील, प्रशांत सोनकावळे, वृषाली विनायक, संतोष जाधव, शंकर गोपाळे व अक्षता गोसावी यांचा सहभाग असणार आहे. सायंकाळी 4:30 ते 06 या कालावधीत ज्ञान विकास संस्था, कोपरखैरणे यांच्या कोळीगीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आला आहे. सायंकाळी 06 ते 07 या कालावधीत ठाणे जिल्ह्यातील आदर्श ग्रंथपालांचा व उत्कृष्ट वाचकांचा सत्कार करण्यात येणार आहे. यामध्ये जिल्हा ग्रंथालय संघटनेचे अध्यक्ष चांगदेव काळे, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणेचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर, मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणेचे सदस्य विनायक गोखले, प्रा.माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशीचे अध्यक्ष सुभाष कुलकर्णी यांचा सहभाग असणार आहे.

तरी, ठाणे जिल्ह्यातील जास्तीत जास्त ग्रंथप्रेमींनी या ग्रंथोत्सवास भेट द्यावी, असे आवाहन ठाणे ग्रंथोत्सव 2024 जिल्हा ग्रंथालय अधिकारी तथा समन्वय समितीचे अध्यक्ष सहाय्यक ग्रंथालय संचालक, मुंबई विभाग श्री.प्रशांत पाटील तसेच सर्व सदस्य, सदस्य सचिव यांनी केले आहे.

## वात्रटिका

### मोहिनी प्रेमाची

कोणाची कशी रंगेल
कळत नाही लवस्टोरी...
घरातच राहून केली
घरातच बेमालूम चोरी...
प्रेमाच्या वाटेवर चालता
कशी पडली मोहिनी...
अडसर दूर केला खरा
पण जिवानिशी गेला धनी...

हणमंत पडवळ,
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटिंग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# शिवस्मारक तर्फे १ जानेवारी रोजी जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

## विजेत्यांना मिळणार रोख रक्कम आणि सन्मानचिन्ह !

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी शिवस्मारक सभागृहात कै. अनंतराव कुलकर्णी स्मृती वक्तृत्व स्पधेर्चे आयोजन करण्यात आल्याची माहिती शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत दिली.

दि. १ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता शिवस्मारक सभागृहात स्पधेर्चे उद्घाटन होणार आहे. इयत्ता ५ वी ते ७ वी, ८ वी ते १० वी आणि महाविद्यालयीन गट अशा तीन गटांमध्ये ही स्पर्धा होईल. इयत्ता ५ वी ते ७ वी गटासाठी 'शिवरायांचे बालपण', 'माझे आवडते पुस्तक', 'माझी शाळा विद्येचे आणि संस्काराचे मंदिर', 'मोबाईलचा मी अनुभवलेला चांगला उपयोग' हे विषय असणार आहेत. ८ वी ते १० वी गटासाठी 'मोबाईल व्यक्तिमत्व विकासाचे प्रभावी साधन', 'महाभारतातील माझे आवडते व्यक्तिमत्व', 'वंदे मातरम महामंत्राची १५० वर्षे' 'वृक्षारोपण काळाची गरज', तर महाविद्यालयीन गटासाठी 'रामायणातील समाज पोषक मूल्ये', 'जागतिक पटलावर आजचा भारत', 'स्वातंत्र्य लढ्यातील महापुरुषांची प्रेरणा- महाभारत', 'बांगलादेशात सध्या काय चालले आहे ?' हे विषय असणार आहेत.

ही वक्तृत्व स्पर्धा मराठी व हिंदी भाषेत होणार आहे. सर्व स्पर्धकांना या स्पर्धेत विनाशुल्क प्रवेश असून प्रत्येक स्पर्धकास आठ मिनिटांचा वेळ दिला जाईल. या स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारण्याची अंतिम मुदत ३० डिसेंबर पर्यंत आहे. प्रत्येक गटातून स्वतंत्र पारितोषिके दिली जाणार आहेत. प्रथम विजेत्यास ३ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र, द्वितीय विजेत्यास २ हजार रुपये, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र तर तृतीय विजेत्यास १ हजार रुपये स्मृतीचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच प्रत्येक स्पर्धकास सहभाग प्रमाणपत्र दिले जाईल.

अधिकाधिक शाळा आणि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभागी व्हावे व अधिक माहितीसाठी नवी पेठ येथील शिवस्मारक कार्यालयात किंवा व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर यांच्याशी ९८२२४९८३७३ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी केले. या पत्रकार परिषदेस शिवस्मारकचे सचिव गंगाधर गवसने, स्पर्धा प्रमुख प्रसाद जिरांकलगीकर, संचालक धनंजय कुलकर्णी, व्यवस्थापक मल्लिनाथ व्हटकर आदी उपस्थित होते.

# नेहरू युवा केंद्र व क्रांती बहुउद्देशीय संस्थेच्यावतीने सुशासन दिनानिमित्त खुल्या वक्तृत्व स्पर्धा



**बार्शी, (कटूसत्य वृत्त):-** भारत सरकार द्वारा, क्रीडा व युवक मंत्रालय अंतर्गत, नेहरू युवा केंद्र सोलापूर, क्रांती बहुद्देशीय संस्था, बेलगाव व श्री शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती (सुशासन दिवस) निमित्त खुल्या वक्तृत्व स्पर्धा श्री. शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी याठिकाणी मोठ्या उत्साही वातावरणात पार पडल्या.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपती शिवाजी महाराज, कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे व माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. "सुशासन सुव्यवस्थित चालवण्यासाठी क्वान्टिटी ला महत्व न देता क्वालिटी ला महत्व दिले तरच आपण आपल्या ध्येयापर्यंत पोहचू शकतो. तसेच विद्यार्थ्यांनी आपली ध्येयपूर्ती गाठण्यासाठी जिद्ध आणि सातत्य व महापुरुषांचे विचार आत्मसात करण्याची गरज असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव यांनी आपल्या मनोगतात म्हटले. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष जयकुमार शितोळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात अटल बिहारी वाजपेयी यांच्या जीवनावर प्रकाश टाकत वाजपेयींच्या काव्यपंक्तींनी वातावरण प्रफुलित केले.

स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना अनुक्रमे प्रथम क्रमांक - रोख रक्कम 1001 रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, द्वितीय क्रमांक - रोख रक्कम 701 रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, तृतीय क्रमांक - रोख रक्कम 501 रुपये, सन्मानचिन्ह व सन्मानपत्र, उत्तेजनार्थ - रोख रक्कम 301 रुपये, व सन्मानपत्र देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शीचे खजिनदार जयकुमार शितोळे हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळासाहेब जाधव, मंडळ अधिकारी प्रशांत कोरके, श्री. शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य डॉ दीपक गुंड, क्रांती बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष धिरज शेळके आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेचे परीक्षण प्रा. शंकर शेटे व डॉ. चंद्रकांत उलभगत यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रा. जयद्रथ गायकवाड यांनी केले.

# कुमठे कनिष्ठ महाविदयालयात क्रिडा सप्ताहाचे उद्घाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** संस्थेचे विश्वस्त मा.नगरसेवक श्री जयकुमार माने यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयात क्रीडा सप्ताहाचे आयोजन करन्यात आले आहे या निमित्त क्रिकेट स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या आहेत.

सदर क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री वसंत गुंगे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी लिटल स्टार इंग्लिश मिडीयम चे समन्वयक श्री मलकारी कोरे, राष्ट्रविकासच्या मुख्याध्यापिका मंगला मोरे मॅडम, श्री अरुण नीळ, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रमुख प्रा. संजय जाधव उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी श्री वसंत गुंगे यांनी यावेळीअसे मत व्यक्त केले की खेळाडूंनी चांगल्या प्रकारचे खेळाचे प्रदर्शन करून आपल्या महाविदयालयाचे नाव उज्वल करावे. तसेच अशा क्रीडा स्पर्धेमधूनच खेळाडूमध्ये संघ भावना निर्माण होते हीच संघ भावना देशासाठी उपयोगाला आणावी आपले शरीर बळकट करावे मन, मनगट, मेंदु, सशक्त करावा असे विचार व्यक्त केले.

सदर स्पर्धेची नियमावली प्रा. दीपक शिंदे यांनी सर्व खेळाडूंना सांगितली. पहिल्या सामना 11वी कला विरुद्ध 11वी वाणिज्य यांच्यात झाला. या सामन्यात 11वी कला यांचा विजय 8 खेळाडू राखून विजय झाला.

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून प्रा.राजीव निकम द्वितीय पंच म्हणून प्रा बंडोपंत बाबर यांनी काम केले. गुणलेखकाचे काम प्रा. विजयकुमार वाळके यांनी पाहिले. सामन्याचे समालोचन प्रा. हणमंत शिंदे यांनी केले.

सदर स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रा. दादाराव डांगे व प्रा. विनोद थोरात यांनी प्रयत्न केले.

# फिनिक्स इंग्लिश स्कूलमध्ये 'आपले घर 'या उपक्रमात मुलांनी आकर्षक घरे तयार केली



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** माळशिरस तालुक्यातील २५/४ लवंग येथील फिनिक्स इंग्लिश स्कूल मधील चिमुकल्या विद्यार्थ्यांसाठी "आपले घर " हा उपक्रम राबविण्यात आला.या उपक्रमात बालकांनी आपल्या कल्पक बुद्धीचा सुरेख वापर करून सुंदर घरांची प्रतिकृती निर्माण केल्या.

शैक्षणिक अभ्यासक्रमा बरोबर लहान मुलांच्या अंगातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा व त्यांच्या बुद्धीला चालना मिळावी या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.मुलांनी रंगीत कागद,रंग व छापडीचा वापर करत एकापेक्षा एक घरांची व बंगल्यांची प्रतिकृती साकारली यामध्ये मुलांनी शेतातील घराच्या परिसरात रस्ते,चारा खाणाऱ्या गाई, गुरे, झाडे, फुले, कोंबड्या, घरावर उड्या मारणारी माकडे, शेतात राबणारा शेतकरी, दाणे टिपणारे पक्षी, झोका खेळणारी मुले, अंगणातील तुळस,दुचाकी चारचाकी वहानांचे घराभोवती पार्किंग अशा सुंदर घरांच्या प्रतिकृती तयार केल्या आहेत. हा उपक्रम फिनिक्स इंग्लिश स्कूलच्या प्रिन्सीपल नूरजहाँ शेख यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आला.

त्यांना सहकार्य रणजित चव्हाण, गुलशन शेख,तमन्ना शेख यांचे लाभले.

# नातेपुते एज्युकेशन सोसायटीच्या ६९ व्या वर्धापनदिनानिम्मीत्त वार्षिक पारितोषिक व विविध कार्यक्रम

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते एज्युकेशन सोसायटीच्या ६९ व्या वर्धापनदिनानिम्मीत्त वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ व विविध कार्यक्रमांचे आयोजन केलेले असुन वर्धापनदिन दिनांक १ जानेवारी, २०२५ रोजी संपन्न होत आसल्याची माहिती नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे मुख्याध्यापक दत्तात्रय यादव उपप्राचार्य भारत पांढरे बालक मंदिर विभागाचे मुख्याध्यापक कुंडलिक इंगळे यांनी दिली असुन सदरचे सर्व कार्यक्रम संस्थेचे मार्गदर्शक संचालक सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहेत.या विविध कार्यक्रमामध्ये गुरुवार दि. १९ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा.स्वामी विवेकानंद शालेय क्रीडा स्पर्धा उद्घाटन नातेपुते नगरपंचायतचे मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्या शुभहस्ते व नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे माजी चेअरमन ॲड.डी.एन. काळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले.रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत विविध गुणदर्शन (बालक मंदिर व प्राथमिक विभाग) सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा.बालक मंदिर व प्राथमिक विभाग वार्षिक शालेय व क्रीडा स्पर्धा परितोषिक वितरण समारंभ होणार आहे यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे व अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे यांच्या अध्यक्षस्थानी हा कार्यक्रम होणार आहे तसेच सोमवार दि. ३० डिसेंबर २०२४ रोजी दुपारी ३.३० ते ५.३० या वेळेत डॉ. बा.ज. दाते प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींचा विविध गुणदर्शन कार्यक्रम होणार आहे मंगळवार दि. ३१ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ८.३० वा. स्वामी विवेकानंद शालेय क्रीडा स्पर्धा - २०२४ चा पारितोषिक वितरण समारंभ सोलापूर येथील प्रख्यात प्रेरणादायी व्याख्याते.प्रा. इसाक मुजावर यांच्या शुभ हस्ते व नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन डॉ. एम. पी. मोरे यांच्या अध्यक्षस्थानी होणार आहे.बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.३० वा.नातेपुते एज्युकेशन सोसायटी ६९ वा वर्धापनदिन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे विटा येथील अभय भंडारी तसेच सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व संस्थेचे मार्गदर्शक संचालक बाबाराजे देशमुख यांच्या शुभहस्ते व नातेपुते एज्युकेशन सोसायटीचे चेऊरमन धैर्यशील भाऊ देशमुख यांच्या अध्यक्षस्थानि होणार आहे. यासाठी नातेपुते एज्युकेशन सोसायटी डॉक्टर बाळकृष्ण जयवंत दाते प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय व बालक मंदिर व प्राथमिक विभागामधील सर्व शिक्षक शिक्षिका व कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# महाकुंभमेळयाच्या भविकांकरिता न्यासाकडून २५० ताट व २५० कापडी पिशव्या



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जन्मेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली नेहमीच न्यास हे धार्मिक गती विधीला महत्त्व देऊन कार्यरत असून,त्याप्रमाणे प्रयागराज महाकुंभमेळया करिता येणाऱ्या भविकांकरिता मंडळाकडून २५० ताट व २५० कापडी पिशव्या देण्यात आल्या.

प्रयागराज उत्तर प्रदेश येथे होत असून,या महाकुंभ मेळाव्यासाठी "एक थाली, एक थैला" अभियाना अंतर्गत न्यासाकडून २५० ताट व २५० कापडी पिशव्या न्यासाचे सचिव शामराव मोरे यांच्या हस्ते जिल्हा पर्यावरण गतिविधि यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. पर्यावरणाचे संरक्षण व्हावे निसर्गात प्लास्टिक व पत्रावळी यांच्यामुळे मोठ्या प्रमाणात कचरा निर्माण होतो तो टाळण्याकरता ही उपक्रम राबविण्यात येत आहे. यावेळी सोलापूर जिल्हा पर्यावरण प्रमुख प्रवीण तळे, पर्यावरण पालक सुशील हेरस्कर, निसर्ग सेवा फाउंडेशन प्रमुख सुनील बिराजदार,मल्लम्मा पसारे,विद्याधर गुरव, महेश वागदरे, तम्मा शेळके, रवी वाघमोडे ,प्रमोद लोकापूरे,संदिप कटकधोंड व न्यासाचे सचिव शामराव मोरे, मुख्य पुरोहित अप्पू पुजारी, बाळासाहेब घाडगे, बाबूशा महिंद्रकर, बाळासाहेब पोळ, सतीश महिंद्रकर, शहाजीबापू यादव, नामा भोसले, सिद्धाराम कल्याणी, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, तानाजी पाटील, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, एस.के. स्वामी, मल्लिनाथ कोगनुरे, शावरेप्पा माणकोजी, कल्याण देशमुख, विशाल घाडगे, विठ्ठल रेड्डी यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण बहुसंख्येने उपस्थित होते.

# राज्यस्तरीय करुणाशील पुरस्कार वितरण सोहळा शनिवारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** करुणाशील बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने 21 वा राज्यस्तरीय करुणाशील पुरस्कार वितरण सोहळा शनिवार दि. 28 डिसेंबर रोजी दुपारी 4 वाजता शिवस्मारक सभागृहात आयोजित करण्यात आला आहे. राज्यभरातील समाज कार्य, वैद्यकीय आणि कला क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव करण्यात येणार आहे, अशी माहितीनिमंत्रक आशुतोष नाटकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, वैद्रद्यकीय शिक्षण व संशोधन केंद्र, मुंबई संचालक डॉ. अजय चंदनवाले, सुश्रुषा सेवा व प्रबंधक महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल, मुंबई अधिक्षिका अर्चना बढ़े, ज्येष्ठ साहित्यिक डॉ नसीमा पठाण, जी.एम. मागासवर्गीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब वाघमारे यांची उपस्थिती लाभणार आहे. यंदाचे विशेष सन्मान पुरस्काराचे मानकरी असे - स्नेह गौरव पुरस्कार -डॉ. जितेंद्र संकपाळ, जीवन गौरव पुरस्कार- सुनिल गोडबोले, विशेष सन्मान- परिसेविका अंजली कुलथे, अधिसेविका लक्ष्मी आपटे, संजीवनी गायकवाड, मंदा संजय थोरात, सहाय्यक अधिसेविका भारती वीर, शांता पाटील, नजमा नूर महम्मद सय्यद, विभागीय परिसेविका यशोदा नाईक, नर्सिंग ऑफिसर शालिनी थुल, अलका गणेश मैड-टाक, नंदा कांबळे (खांडेकर), सुधा मंगरूळकर, महिमा अमृत, रूथ इंगळे, रंजिता डोंगरे, जागृती गायकर, सुधाकर गायकवाड आदींचा यावेळी पुरस्काराने गौरव करण्यात येणार आहे. यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आशुतोष नाटकर यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेस वैशाली गुंड, सुनीता गायकवाड,भीमराव लोखंडे, सुशील नाटकर आदी उपस्थित होते.

# आपापसातले मतभेद बाजूला ठेवून एकसंघ व्हा - आ. राजू खरे

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** १४ एप्रिल व ६ डिसेंबर व्यतिरिक्त समाज एकसंघ दिसत नाही. समाज एकसंघ ठेवायचा असेल तर धर्म वाढवावा लागेल. धमार्चे काम वाढल्याशिवाय समाज एकसंघ राहणार नाही. यासाठी आपापसातले मतभेद बाजूला ठेवून एकसंघ व्हा, असे आवाहन करीत येत्या दोन महिन्याच्या कालावधीतच समाजकल्याण विभागाच्या माध्यमातून या दोन एकर जागेत सोलापूर जिल्ह्याचे वैभव म्हणून गौरविण्यात येईल असे २५ कोटी रुपये खर्चून बौद्ध विहार बांधण्यात येईल, असे आश्वासन आ. राजू खरे यांनी टाकळी सिकंदर येथे घेण्यात आलेल्या धम्म परिषदेत दिले. मोहोळ तालुक्यातील टाकळी (सिकंदर) येथील सारनाथ बुद्धविहार परिसरात भन्ते सुमेधजी नागसेन यांच्या संयोजनाखाली धम्म परिषदेचे आयोजन करण्यात आले होते यावेळी ते बोलत होते.

यावेळी सरसाबाई सोनटक्के यांनी बुद्ध विहारासाठी दान केलेल्या दोन एकर जागेत बांधण्यात आलेल्या भव्य अशा ३२ फूट उंचीच्या अशोक स्तंभाचे उद्घाटन आमदार राजू खरे व त्यांच्या सुविद्य पत्नी तृप्ती खरे यांच्या हस्ते करण्यात आले.

प्रारंभी या धम्म परिषदेचे उद्घाटन भिक्खू संघाच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी या परिषदेत भन्ते महाविरो थेरो, भन्ते धम्मशील थेरो, भन्ते नागसेन बोधी थेरो, भन्ते बोधीधम्म थेरो, भन्ते बी. सारीपुत्त, भन्ते काश्यप, भन्ते सुमंगल, भन्ते धम्मबोधी, भन्ते सोनूत्तूर, भन्ते सुमेधजी नागसेन (बुद्धलेणी खरोसा), वनिता चंदनशिवे, डॉ. शशिकांत गायकवाड, डॉ. रेखा ओव्हाळ, शारदा गजभिये आदी धम्मदेसना उपस्थित होते. तर या धम्म परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून आमदार राजू खरे, तृप्ती खरे आंबेडकरी विचारवंत दत्ता गायकवाड, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख चरणराज चवरे, दीपक गायकवाड, मोहोळचे माजी नगराध्यक्ष रमेश बारसकर, शिवसेनेचे तालुकाप्रमुख अशोक भोसले, बाळासाहेब गायकवाड आदी उपस्थित होते. टाकळी येथे बुध्दगयेहून आणलेल्या बोधिवृक्षाच्या बीजापासून बनवलेले रोप आमदार राजू खरे यांच्या हस्ते लावण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध साहेबराव येरेकर यांचा भीम गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ही धम्म परिषद पार पाडण्यासाठी सरपंच नाना सोनटक्के, संजय सोनटक्के, दीपक वाघमारे, रवी सोनटक्के, मुजावर सोनटक्के, नितीन सोनटक्के, सचिन बनसोडे, आदींसह टाकळी येथील समस्त बौद्ध उपासकांनी परिश्रम घेतले.

# राज्यातील पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअरसाठी मदत करणार!

## ना.चंद्रकात पाटील यांची डिजिटल मिडिया संघटनेला ग्वाही



**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** "राज्य व केंद्र सरकारच्या विविध योजनांच्या लाभां व्यतिरिक्त कला, क्रीडा, संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची क्षमता असलेला पत्रकारांच्या मुला-मुलींना त्या-त्या क्षेत्रात करिअर करण्यासाठी मदत करण्याची ग्वाही भाजपचे ज्येष्ठ नेते आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी डिजिटल मिडिया संपादक पत्रकार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळात मंत्री म्हणून कार्य करण्याची तिसऱ्यांदा संधी मिळाल्यास बद्दल डिजिटल मिडिया संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या नेतृत्वाखालील पदाधिकाऱ्यांनी ना.चंद्रकांतदादा पाटील यांच्या कोथरुड येथील निवासस्थानी त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या.संघटनेच्या कन्हेरी मठ कोल्हापूर येथे झालेल्या अधिवेशनात ना.चंद्रकांतदादा पाटील यांनी राज्यातील पत्रकारांच्या मुला-मुलींच्या करिअर व विकासावर भर देण्याचे आवाहन करुन त्यासाठी विशेष प्रतिष्ठान स्थापन करण्याची सूचना केली होती.त्यानुसार राजा माने यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या प्रतिबिंब प्रतिष्ठानला आणि विशेषतः पत्रकारांच्या मुलींच्या करिअरसाठी भरीव मदत करण्याची ग्वाही चंद्रकांतदादांनी दिली.यावेळी त्यांना श्रीविठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती भेट देण्यात आली.संघटनेचे उपाध्यक्ष सतीश सावंत, सचिव महेश कुगावकर, पदाधिकारी सूर्यकांत वायकर,तेजस राऊत, अमोल पाटील खास रे टीव्हीचे संचालक संजय कांबळे, अमोल साळुंखे, बालाजी राजपूत आदी उपस्थित होते.

# महापालिकेच्या कारवाईत सहा किलो प्लास्टिक जप्त




**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिका प्रशासनाच्यावतीने प्लास्टिक विरोधी कारवाईची मोहीम सुरू करण्यात आली आहे. त्याअंतर्गत गुरुवारी विविध ठिकाणी आस्थापना, दुकानांची तपासणी करण्यात आली. यामध्ये सहा दुकानांवर कारवाई करत तीस हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. एकूण सहा किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात प्लास्टिक विरोधी कारवाई मोहीम हाती घेण्यात आली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत ही मोहीम राबविण्यात येत आहे. मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार, अनिल चराटे यांच्या नियंत्रणाखाली महापालिका आरोग्य निरीक्षकांच्या माध्यमातून शहरातील विविध दुकानांची झोन आठ कडील प्रभाग २२ तपासणी करण्यात आली. बंदी असलेले प्लास्टिक आढळून आलेल्या दुकानांना प्रत्येकी पाच हजार रुपये दंड आकारण्यात आला. बाळीवेस, टिळक चौक,भद्रावती पेठ या परिसरात ही मोहीम राबवली गेली.झोन नंबर सात कडील प्रभाग क्रमांक १४, २३, २५ मध्ये प्लास्टिक विरोधी मोहीम अंतर्गत १५ आस्थापनांची तपासणी केली असता तीन आस्थापनांकडे बंदी असलेले प्लास्टिक आढळून आल्याने पंधरा हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. अंदाजे पाच किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक नागनाथ मेंडगुळे, आरोग्य निरीक्षक हमीद हिरोली, आरोग्य निरीक्षक सोमनाथ सिध्दागणेश, विठोबा शिंदीबंदे व शिवाजी कांबळे उपस्थित होते.व ३६ मधील प्लास्टिक मोहीम अंतर्गत दोन दुकानांची तपासणी केली असता प्लास्टिक ग्लास आढळून आले म्हणून दहा हजार दंडात्मक कार्यवाही करण्यात आली. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक अन्वर शेख, आरोग्य निरीक्षक सुनील राठोड, आरोग्य निरीक्षक सतीश व्हनमाने, सतीश क्षीरसागर, शाहरुख शेख यांचा या मोहिमेत सहभाग होता. दरम्यान,मरिआई चौक ते देगाव परिसरात सर्व आस्थापनांची तपासणी केली.देगाव भागामध्ये एका दुकानात प्लास्टिक आढळून आल्याने पाच हजार रुपये दंडात्मक कारवाई करण्यात आली. यावेळी मुख्य आरोग्य निरीक्षक नागटिळक,आरोग्य निरीक्षक वनारोटे,शशिकांत शिरसट, कोंगे व धरणे यांचा सहभाग होता. एक किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले.

# माळीनगर येथे कृषीकन्यांचे वतीने माती परीक्षण शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**माळीनगर (कटूसत्य वृत्त):-** माळीनगर (ता. माळशिरस) परिसरातील शेतकऱ्यांसाठी शेतीपूरक फायदेशीर माती परीक्षण करणे ही काळाची गरज याबाबत अकलूज येथील रत्नाई कृषी महाविद्यालयाच्या कृषीकन्यांनी ग्रामीण भागामध्ये जागरूकता कायार्नुभव कार्यक्रम २०२४-२५ अंतर्गत माळीनगर परिसरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

माती परीक्षणासाठी नमुना शाखीय पद्धतीने कसा घ्यावा, ते करत असताना कोणती काळजी घ्यावी याची प्रात्यक्षिक घेतले. वर्षानुवर्षे पीक लागवडीमुळे मातीची सुपीकता कमी होत आहे या यासाठी मातीत कोणती मूलद्रव्य कमी आहेत याची माहिती माती परीक्षणाद्वारे मिळते. या उपक्रमासाठी सरपंच अनुपमा एकतपुरे व ग्रामस्थ यांनी उपस्थिती दर्शवली. या उपक्रमासाठी प्राचार्य आर.जी. नलवडे, कार्यक्रम समन्वयक प्रा. एस एम.एकतपुरे, कार्यक्रम अधिकारी प्रा एम एम चंदनकर, कार्यक्रम अधिकारी प्रा एच एच व्ही कल्याणी, रा. एस. आर. आडत (मृदा शास्त्र आणि कृषी रसायनशास्त्र विभाग) यांनी मार्गदर्शन केले. माती परीक्षणाचे महत्त्व कृषी कन्या प्राची जाधव, ईशा घोगरे, प्रणाली यादव, स्नेहल तांबोळकर, कोमल लाड, प्रतीक्षा हेगडे, सोनाली गायकवाड, जिजाऊ बरडे, प्रतीक्षा बनसोडे यांनी माळीनगर परिसरातील शेतकऱ्यांना पटवून दिले.